# प्रकरण दुसरे

## "बारी" कादंबरीचे विशेष

# प्रकरण दुसरे

## "बारी" कादंबरीचे विशेष

१) प्र स्ता व ना

२) "बारी" : कथानकाचे स्वरूप

३) "बारी" : आशयसूत्र

४) "बारी" : व्यक्तिचित्रण

५) "बारी" : सामाजिकतेचे चित्रण

६) "बारी" : भाषाशैली

७) "बारी" : निवेदन

८) सा रां श

९) सं द र्भ

......

# प्रकरण दुसरे

## "बारी" कादंबरीचे विशेष

### प्रस्तावना:

महाराष्ट्रात वेगवेगळया जातीजमातीचे वास्तव्य असल्याचे दिसते. बेरड ही अशा जामतीपैकी एक आहे. "बारी" या कादंबरीत रणजित देसाई यांनी बेरड जमातीचे चित्रण रेखाटले आहे. बेरड समाज हा ग्रामीण जीवनाचा एक भाग असल्याने ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या रणजित देसाई यांना "बारी" कादंबरीत बेरड जमातीचे चित्रण करावे असे वाटणे स्वाभाविक आहे. बेरड लोकांचा वतनदार सरकारदरबारी लोकांशी काही-एक संबंध असल्याचे इतिहासक्रमात दिसते. रणजित देसाई हे अशा सरकार घराण्याशी संबंधीत असल्याने त्यांना हा विषय भावणे स्वाभाविक आहे.

केवळ जुजबी माहितीच्या आधारे बेरडांच्या जीवनावर कादंबरी लेखन करण्यापेक्षा प्रत्यक्ष त्या लोकांमध्ये मिसळून त्यांचे जीवन, त्यांची संस्कृती, त्यांचे विचार समजून घेवून लेखकाने "बारी" ही कादंबरी लिहिलेली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या ग्रामीण परिस्थितीबरोबर बेरडांच्या जीवनामध्ये जे बदल झाल्याचे आढळते. त्याचेच चित्रण "बारी" कादंबरीत रणजित देसाई यांनी केले आहे. त्या जीवनाचे चित्रण करताना लेखकाने ते कोणत्या प्रकारे केलेले आहे. या चित्रणातून कादंबरी लेखनाची कोणती वैशिष्ट्ये दिसतात आणि रणजित देसाई यांच्या लेखनाचे कोणते विशेष आपणास प्रस्तुत कादंबरीत दिसतात याचा विचार प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

"बारी" कथानकाचे स्वरूप:

उपेक्षित बेरड जमातीचे चित्रण करणारी "बारी" ही कादंबरी आहे. बेळगाव जवळील सुतगट्टी गावाला जे घनदाट जंगल लागते त्या जंगलात राहणा-या बेरडांच्या समुहजीवनांची ही कहाणी आहे. त्या जंगलाचा आधार घेऊन वाटमा-या करणा-या बेरडांच्या पारंपरिक जीवनात बदलत्या परिस्थितीनुसार कोणत्याप्रकारे बदल घडत गेला, याचे चित्रण "बारी" कादंबरीच्या कथानकाच्या मांडणीतून आलेले दिसते.

कादंबरीच्या सुरुवातीलाच कादंबरीचा नायक तेग्या गावाकडे येत असताना, नदीच्या काठाला त्याची मासे चोरणा-या नागीशी भेट होते. त्यामुळे तेग्याला राग येतो. म्हणून तो तिला रागावतो. मारतो देखील. पण नागी त्याला फसवून मासे घेऊन जाते. तिचा हा चतुरपणा पाहून तेग्याला ती आवडते. त्यामुळे तेग्या आपला मामा मल्ला याला घेऊन कलू बेरडाकडे घेवून नागीला मागणी घालतो. पण नागी तेग्याबरोबर लग्नाला तयार होत नाही. म्हणून तेग्या आपला मित्र चंद्रोजी याला साथीला घेऊन नागीला पळवून आणून लग्न करतो. सुरुवातीस लग्नाला तयार नसलेली नागी नंतर मात्र आपल्या संसारात रमून जाते.

या "बारी" कादंबरीतील बेरडांचा धंदा चो-या, लुटमार करण्याचा असल्यामुळे काळू गाड्या लुटण्याची वर्दी आणतो. मग तेग्या आपल्या साथीदारांना नेहमीप्रमाणे जमवून गाड्या लुटतो. पण त्या गाड्या आपल्या मालकाच्या आहेत. हे तेग्याला कळताच काळूने चुकीची वर्दी आणली म्हणून त्याला शासन करतो. म्हणून काळू चार दिवस तेग्याला तोंडही दाखवित नाही. नंतर मात्र काळू आपला राग विसरून परत तेग्याकडे येतो. आणि गावात खेळ करण्याविषयी बोलणी करतो. तेग्याही तयार होतो. मग तेग्या आणि काळू बेरडांच्या करमणुकीसाठी चिमणाचा खेळ गावात करतात. या खेळात सारे बेरड आनंदाने सामील होतात.

दर वर्षी प्रमाणे तेग्या दसऱ्याच्या खुशालीसाठी आप्पासाहेबांच्या वाड्यावर येतो. पण आपण त्यांच्या गाड्या लुटल्या हे त्यांना कळले असणार म्हणून तेग्या जरा संकोचूनच असतो. तेग्याला पाहाताच आप्पा-साहेब त्याला तसे बोलूनही दाखवितात. या आपल्या चुकीपायी काय वाटेल ते करावयास तेग्या तयार होतो व तो इनामदारांना शपथही देतो. या शपथेचा फायदा घेऊन इनामदार तेग्याला सरोळीच्या पाटलाचा खून करावयास सांगतात. यावर तेग्या दु:खी, कष्टी होतो. कारण सरोळीच्या पाटला-च्या पदरी चंद्रोजी असतो. हा तेग्याचा लहानपणापासूनचा मित्र असतो. त्यामुळे आपण या जिवाभावाच्या मैत्रीला कायमचे मुकणार ते तेग्याला माहित होते. पण ठरल्याप्रमाणे आमवास्यारात्री तेग्याने चंद्रोजीला जेवायला घरी बोलवून, आपण तिकडे त्याच्या मालकाचा खून करतो. हे चंद्रोजीला कळताच तो तेग्याकडे येवून त्याचा जाब विचारतो आणि चंद्रोजीही आपल्या जीवाभावाच्या मित्राविरूद्ध लढण्यास उभा करतो. पण त्यात चंद्रोजीच तेग्याकडून मारला जातो. यावर तेग्याला अतिशय दु:ख होते. व आपण ह्या आपल्या जीवाभावाच्या मैतराला मारले म्हणून आश्रूही ढाळतो. शेवटी तेग्याला व त्याच्या साथीदाराना पोलीस पकडून नेतात.

इकडे मल्ला, नागी दु:खाने चिंताग्रस्त होतात. तेग्याला सोडविण्या-साठी इनामदाराने सांगितल्याप्रमाणे त्याची मदत घ्यावयास जातात. पण इनामदार आता अंगावर बाजू घेत नाही. शेवटी तेग्याला जन्मठेपेची शिक्षा होते. इकडे नागीला मुलगा (ईश्वरा) होतो. मल्ला नागी कष्टाची काम करून पोट भरत असतात. पण मल्ला म्हातारा झाल्यामुळे एक दिवस मरून जातो. हे तेग्या सुटुन आल्यावर त्याला सगळे समजते व आपल्या मुलाला पाहून जितका तो आनंदी होतो, तितकाच मल्ला गेला हे कळताच दु:खी होतो. व इनामदारान दिला शब्द पाळला नाही म्हणून रागाने लाल होऊन त्याला

जाब विचारतो. खूनाची धमकी देतो. पण आईसाहेब म्हणजे इनाम-दारांची बायको सांत्वन करते म्हणून तेग्या माघार घेतो.

आता तेग्याचा मुलगा ईश्वरा मोठा झाल्यामुळे त्याचे लग्न तळावट्या-च्या सुबव्या बेरडाच्या लगमाशी मोठ्या थाटात होते. पण लग्नाच्या रात्रीच तेग्याच्या घराला आग लागते आणि त्यात लगमा सापडते म्हणून तिला वाचविण्यासाठी आपल्या जिवाची पर्वा न करता नागी पेटत्या घरात शिरून सुनेला वाचविते. पण आपण स्वत: भाजून मरते यावर लगमा, ईश्वरा, तेग्या, काळू यांना अतिशय दु:ख होते.

तेग्याचे घर अचानक जळल्यामुळे नवीन घर उभे करणे आवश्यक असते. म्हणून तो सावकाराकडे दागीने घेऊन येतो. पण आता देशाला स्वातंत्र्य मिळालेले असते. त्यामुळे पूर्वीचे दिवस आता राहिलेले नसतात. याची जाणीव सावकाराला असते. म्हणून तो दागीने न घेताच थोडे पैसे देतो. तेग्याही दिले तेवढे पैसे घेवून लाकूड-फाटा जमा करून घर उभे करतो.

आता कादंबरीच्या पुढच्या कथानकाला वेगळी कलाटणी मिळाली आहे. कारण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे नवीन कायदे, सरकारी धोरणे बदललेली असतात. त्यामुळे परंपरावादी बेरड जीवनाला तडे जातात. आणि ईश्वरा सारखी नवी पीढी या नवीन जीवनाचा स्वीकार करते. यातच परंपरावादी तेग्या, काळू, भिमा ही जुनी पीढी आणि ईश्वरा व त्याचे साथीदार ही नवी पीढी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. याचेच चित्रण कादंबरीच्या दुस-या भागात येते.

जंगलाला आग लागली हे कळताच ईश्वरा गावातील सर्व बेरडांच्या सहाय्याने आग विझवितो. हे सरकारी अधिका-यांना कळताच ते ईश्वराची तारीफ करतात. त्याचा साथीदारांसह सत्कार करण्यात येतो आणि सरकारी ध्येय-

धोरणांचा फायदा घेण्यासाठी ईश्वराही सतत केंद्रात जात असतो आणि केंद्रात काढलेली सोसायटी, औषधपाण्याची व्यवस्था, शाळा, जंगलातील कामधंदा या सर्व गोष्टीचा गावातील तरुण पोर लाभ घेतात. हे परंपरावादी बेरडवृत्तीच्या तेग्याला, काळूला पटत नाही. पण आधुनिक विचारांच्या पोरापुढे त्यांचे काय चालत नाही. म्हणून ते दु:खी होतात. म्हणून भीमराव गस्ती म्हणतात, "अंगावर धड वस्त्र नाही, पाणी पिण्यासाठी विहीर नाही, शाळाही नाही. सर्व प्रगतीपासून वंचित असा बेरड समाज. तेंव्हा बेरडांनी चोरी करावी. प्रतिष्ठांची चाकरी करावी. त्यांच्या शेतांची गुरा-ढोरांची आणि घरांची राखण करावी. लाचारीचे, दारिद्रयाचे जीवन जगावे. पोलिसांच्या लाथा खाव्यात हेच बेरडांचे जीवन." [१] हे खरेच आहे. कारण इतके हालाकीचे जीवन बेरडांच्या वाटयाला आले तरी ते आपले जुने विचार सोडत नाहीत.

बेरडांचे बहिष्कृत, गुन्हेगारी जीवनाचे चित्रण करण्याच्या हेतूने ही कादंबरी लिहिली आहे. बेरड जमातीचे दारिद्रय, अगतिकता, पराभूतता, दुभंगलेपणा दाखविणारे प्रसंग प्रत्ययकारी झाले आहेत. पांढरपेशी सुशिक्षित समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या, क्षुद्र व तिरस्कृत बेरड जीवनाचे दर्शन घडविणा-या या प्रसंगाची उत्सुकता वाचकाला अंतर्मुख करते. रणजित देसाईंनी वेगळ्या जीवनाचे विशिष्ट दृष्टिकोणातून चित्रण करण्याचा हेतू "बारी" कादंबरीत आहे. त्यामुळे वि.स. खांडेकर या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, "या कादंबरीचे बीज मनात पडल्यापासून ती सर्व बाजूंनी फुलविण्याकरिता त्यांनी नाना प्रकारचे श्रम घेतले." [२] हे वि.स. खांडेकरांचे मत रास्तच आहे. कारण "बारी" कादंबरीचे कथानक लक्षात घेता, रणजित देसाईंनी ती फुलविण्याकरिता खरोखरच श्रम घेतले आहेत.

"बारी" आशयसूत्र :

ग्रामीण जीवनातील एखाद्या भीषण प्रश्नाचे चित्रण करणे किंवा जंगलात वाटमाऱ्या करणाऱ्या बेरड, आदिवासींच्या जीवनातील परिवर्तनाचे चित्रण करणे हाच "बारी" कादंबरीचा हेतू असल्याचे दिसते.

बेळगाव जवळील सुतगट्टी गावाला जे घनदाट जंगल आहे त्या जंगलात राहणाऱ्या बेरडांच्या समूह जीवनाची ही कहाणी आहे. त्या जंगलाचा आधार घेऊन वाटमाऱ्या करणाऱ्या बेरडांच्या पारंपरिक जीवनात बदलत्या जीवनामुळे जो प्रश्न निर्माण होतो याचे चित्रण कलात्मकतेने आणि तटस्थपणे रणजित देसाई यांनी रेखाटले आहे. १९६० पूर्वी ग्रामीण परिसराचे जे सांकेतिक व एकांगी चित्रण होत होते, त्याला वेगळे वळण देणारी ही कहाणी आहे. पण ही कहाणी बाह्यत: तेग्याची असली तरी आंतरिकदृष्टीने ती सुतगट्टीच्या बारीतल्या बेरड जमातीची आहे. किंबहुना या जमातीसारखेच जीवन जगत आलेल्या सर्व दुर्दैवी जमातींची ही जीवनकथा आहे. ज्ञानाचा, संस्कृतीचा किंवा चरितार्थाच्या नव्या साधनांचा स्पर्शही न झालेल्या परिस्थितीत ही जमात पिढयान्‌पिढया राहात आली, जगत आली. तेग्याच्या व त्याच्या जामतीच्या जीवनाचे परंपरागत स्वरूप, या जीवनावर आक्रमण करणाऱ्या अनेक नव्या गोष्टी, तेग्याच्या व या जमातीच्या परिवर्तनासंबंधीच्या प्रतिक्रिया हे सर्व रणजित देसाई यांनी हळुवार हाताने व वस्तुनिष्ठ दृष्टीने रेखाटले आहे. हाच कादंबरीचा मुख्य आशय आहे.

बेळगावला बाजाराला जाणाऱ्या गाडया सुतगट्टीच्या जंगलात अडवणे व गाडीतील माणसांचा पैसा-अडका, दागिने काढून घेणे, जंगलातील साधनसामुग्रीवर व नदी-ओढयातील मासे पकडून गुजराण करणे, हा बेरडांचा उद्योग. दिला शब्द पाळणे हा त्यांचा स्थायीभाव होय. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदलत्या परिस्थितीत या बेरड जमातीला जगता येत नाही. परिस्थितीशी

जुळवून घेता येत नाही. त्यामुळे ही कादंबरी तेग्याची शोकांतिका आहे. या संदर्भात भालचंद्र फडके म्हणतात, "रणजित देसाई यांनी बेरडवाडीचा उध्दार करणारा गांधीवादी विचार सरणीचा ईश्वरा उभा केला आहे. पण बदलत्या काळाशी तडजोड करता न आल्याने सिंगात किडे पडलेल्या बैला-सारखी अवस्था तेग्याची झाली आहे व त्या एकाकी जीवनातच तो पूर्णपणे कोसळतो." म्हणून भालचंद्र फडके यांना तो सांकेतिक वाटतो.

या कादंबरीचा शेवट लक्षात घेता बेहरांच्या जगाची आम्हा पांढर-पेशांना आणि सुशिक्षितांना शतकानुशतके दाद नव्हती. निदान त्यात आपल्या सारखीच माणसे राहात आहेत. आपल्यासारख्याच भावभावना उरात बाळगून ती जगत आहेत. याचे चित्रण बेरड जमातीच्या अनुषंगाने "बारी" कादंबरीमध्ये आले आहे. आपल्याप्रमाणेच पोटासाठी घर सोड-ण्याची पाळी येऊन, ती कशी व्याकूळ झाली आहेत याची दाद आम्हाला पूर्वी नव्हती. आजही नाही ! अशी असंख्य चिमुकली जगे या दुर्दैवी देशात दीर्घकाळ जगत आली आहेत. त्यातल्या या एका जगाचा कलात्मक रीतीने रणजित देसाई यांनी परिचय करुन दिला आहे. म्हणून वि.स. खांडेकर या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, "तेग्याचा मुलगा ईश्वरा यांच्या द्वाने कादंबरीकाराने ज्या समस्येला स्पर्श केला आहे, ती फार महत्त्वाची आहे. मात्र ती या बेरड जमातीपुरतीच मर्यादित आहे असे नाही. गेल्या शतकात आपल्या समाजात जी नाना प्रकारची परिवर्तने झाली आणि याच्यापुढे पूर्वीपेक्षा अधिक विलक्षण असे जे बदल होणार आहेत. त्याचे स्वरुप लक्षात घेता कादंबरीकाराने सूचित केलेल्या या अवघड समस्येची मांडणी "बारी"सारख्या चिमुकल्या चौकटीच्या कादंबरीत होणे कठीण आहे." [3] हे वि.स. खांडेकरांचे मत या कादंबरीच्या आशयाच्या संबंधी खरेच आहेत.

"बारी" व्यक्तिचित्रण: "तेग्या" :

"बारी" कादंबरीतील "तेग्या" हा कादंबरीचा नायक आहे. त्याच्या

तरुणपणापासून म्हातारपणापर्यंतचे जीवन या कादंबरीत आले आहे. रणजित देसाई यांनी कथानकाला उठावदारपणा देण्यासाठी तेग्याच्या व्यक्तिगत आणि कौटुंबिक जीवनावर नेमका प्रकाश टाकला आहे. हा तेग्या आपणासमोर येतो तो तारुण्यानी मुसमुसलेला, पराक्रमाचा मुर्तिमंत पुतळा. त्याचप्रमाणे बेरड समाजाचा नायक. त्यासाठी कधी संकटांना सामोरे जाणारा, तर कधी अंधारात वावरणारा, तर कधी सुखात विलीन होणारा आणि दु:खाला दुजोरा देणारा. अशा विविध रुपात तेग्याचे व्यक्तिचित्रण आले आहे.

कादंबरीच्या सुरवातीलाच आपले मासे चोरणाऱ्या नागीशी तेग्याची भेट होते. याकरिता तो तिला काय वाटेल ते बोलतो. मारतो देखील. पण नागी त्याला फसवून मासे घेऊन जाते. या स्वप्नवत घडलेल्या प्रकाराने तेग्या चकित होतो. आपण बेरडांचा म्होरक्या, आणि एका पोरीने फसवून हातातील फरशी न्यावी याचे कोडे त्याला कळेना. त्यामुळे नागी त्याला आवडते. म्हणून तिला पळवून आणून तिच्याशी लग्न करतो. आणि आनंदाने संसार थाटतो. हा आनंद तो नागीला बोलूनही दाखवितो, "नागी खरं सांगू ? तू आल्यापासून बग घर कसं भरल्यासारकं वाटतया. दिस कसं ग्येलं त्येबी कळलं न्हाई." ४ यावरुन तेग्या आपल्या पत्नीसह सुखामध्ये समाधानी असतो हे स्पष्ट होते.

गावचा नाईक तेग्या असल्यानुळे गावच्या पोटापाण्याची व्यवस्था त्यालाच पहावी लागते. याकरिता काढून आणलेल्या वर्दीनुसार साथीदारांच्या साह्याने गाड्या लुटतो. पण ह्या गाड्या आपल्याच मालकाच्या आहेत हे समजताच आईसाहेबांच्याकडे येवून माफी मागतो. यावरुन तेग्या जातीनं बेरड असला तरी खाल्ल्या अन्नाला जाणतो हे स्पष्ट होते. पण तरीसुध्दा इनामदारांच्याकडे येण्यास भीत असतो आणि घडते तसेच.

इनामदारांच्याकडे येताच त्याला ते बेईमान म्हणतात. तेग्या जातीन बेरड असल्यामुळे व इनामदार त्याला बेइमान म्हटल्यामुळे त्याला राग येतो आणि म्हणतो, "सावकार ! जोड्यानं हाना खरं बेइमान म्हनू नगा, खास बेरडाची जात हाय माजी." ५ असे म्हणून झाल्या चुकीची भरपाई मागशिला तेनं करतो म्हणून खंडोबाची शपथ देतो. यावरून तेग्या किती मानी होता हे स्पष्ट होते. पण या शपथेचा फायदा घेऊन इनामदार त्याच्याकडून सरोळीच्या पाटलाचा खून करण्यास सांगतो. या शब्दांनी तेग्याचा धीर खचतो. सारे अंग कापू लागते. कारण सरोळीच्या पाटलांच्या पदरी असलेल्या चंद्रोजीशी तेग्याची अगदी जिवाभावाची मैत्री असते. आता आपली ही मैत्री तुटनार म्हणून तेग्याला पश्चाताप होतो. पण शपथेत अडकल्यामुळे शेवटी सरोळीच्या पाटलाचा खून करतो. आणि जाब विचारावयास आलेल्या चंद्रोजीचाही खून करतो व नको ते घडले म्हणून दु:खी, कष्टी होतो. यावरून तेग्याच्या पश्चातापाची कल्पना येते. तसेच दिल्या शब्दाला जागणारा, आपल्या मित्रावर जिवापाड प्रेम करणारा असा तेग्या रणजित देसाईंनी रेखाटला आहे. बेरड जमातीच्या तेग्यासारख्या दरोडेखोराच्या ठिकाणी माणूसकी असते. सर्वसामान्य माणसासारख्याच त्याच्या भावभावना आहेत. तो केवळ दरोडेखोर नाही, तर एका चांगल्या माणसाचे गुण त्याच्या ठिकाणी आहेत. असे दाखवून त्याच्यातील माणूसकीचे चित्रण देसाई करतात. हे त्याचे चित्रण स्वभाविक वाटावे असेच आहे. पण तेग्याने केलेल्या चूकीपायी त्याला शिक्षा होते आणि झाल्या चूकीचा पश्चाताप करीत अकरा वर्षे तुरुंगात काढतो आणि तुरुंगातून सुटून आल्यावर त्याला घडून गेलेल्या अनेक गोष्टी कळतात. आपल्या मुलाला पाहून त्याला खूप आनंद होतो. आपल्या आईच्या मृत्यूनंतर आपल्यावर मुलाप्रमाणे प्रेम करणारा मल्लामामा गेल्याचे एकून त्याला खूप दु:ख होते. आपल्या गैरहजेरीत आपल्या बायकोंची झालेली अवस्था पाहून तो कळवळतो. अशा अनेक गोष्टींच्या चित्रणातून तेग्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू लेखकाने चांगल्याप्रकारे रेखाटलेले आढळतात.

तेग्याला आपल्या मुलाबद्दल प्रेम असल्यामुळे, त्याला बेरड जातीचे सर्व शिक्षण देवून बारीतल्या जंगलाची माहिती देतो व आपल्या प्रमाणेच ईश्वराला शूर, धाडसी बनवितो. याचबरोबर त्याचे वाढते वय लक्षात घेऊन त्याचे लग्न लगमाशी लावून देतो. यावरून तेग्या आपल्या मुलाची काळजी घेतो हे स्पष्ट होते. पण लग्नाच्या रात्री अचानक तेग्याच्या घराला आग लागते आणि त्यात नागी भाजून मरते. तेव्हा पत्नीच्या दु:खाने तो टसटसा रडतो व पत्नीच्या आठवणीने सरळ जेवत नाही. कोणाशी फारसे बोलत नाही. यावरून त्याचे आपल्या पत्नीवरील प्रेम दिसून येते.

पत्नी गेल्याचे दु:ख विसरून तेग्याला आपल्या पोरांच्यासाठी आपले घर उभे करणे आवश्यक होते. पण आता पूर्वीचे दिवस राहिले नव्हते. देश स्वतंत्र झाला होता. याची जाणीव तेग्याला असते. म्हणून तो आपलं घर उभारण्यासाठी सुनेच्या अंगावरील दागीने ठेवून पैसे आनावयास जातो. पण सावकार दागीने न घेताच पैसे देतो. ते घेऊन लाकुडफाटा गोळा करून तेग्या आपल्या पोरांच्यासाठी नवीन घर उभे करतो. यावरून तेग्याचे आपल्या मुलावरील, सुनेवरील प्रेम दिसून येते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारी ध्येयधोरणांचा लाभ घेण्यासाठी, आधुनिक विचाराचा ईश्वरा व त्याचे जोडीदार सतत केंद्रावर जात असतात. हे परंपरावादी बेरडवृत्तीच्या तेग्याला पटत नाही. ईश्वरा तेग्यासाठी नोकरी आणतो ते पाहून, "भडव्या नोकरी करूस सांगतुयास ? आन् मी नोकरी करू ? तुज्या बापजाधानं नोकरी कंदी केली व्हती व्हय रं ?" [6] म्हणजे आजपर्यंत चोऱ्या, खून, दरोडे घालून पैसे मिळविलेल्या तेग्याला हे पटत नाही. तसेच सिद्दाला ईश्वरा शाळेत घालतो हे तेग्याला पटत नाही. म्हणून तो सिद्दाला म्हणतो, "तू एक खुळा आन् तुझा बाप सात खुळा. लिवनं-वाचनं ही काय बेरडांची कामं हाईत ? आरं बामनांची लटाई आनी बेरडांचं

लिवनं-वाचनं कंदी पार पडलंय व्हय ?" [७] असं म्हणून तेग्या आपल्या जुन्या विचाराशी जखडून राहतो. पण ईश्वरापुढे त्याचे काय चालत नाही. म्हणून तो दु:खी कष्टी होतो. म्हणून खांडेकर म्हणतात, "तेग्या हा घनदाट अरण्याच्या अंधाऱ्या अंतरगात एखादा वटवृक्ष ऐटीने उभा असावा असा आहे." [८] यावरून तेग्याच्या एकाकी पनाची कल्पना येते.

एकूण तेग्या स्वतंत्र वृत्तीचा आहे. कोणाची ताबेदारी त्याला मानवत नाही. तो परंपरावादी विचाराचा असल्याने परंपरागत व्यवसाय सोडून दुसरे काम स्वीकारण्यास त्याची तयारी नसते. यावरून तेग्याची करारीवृत्ती, मानी स्वभाव अशी गुणवैशिष्टये दिसून येतात. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेता न आल्याने, पुढे त्याची जी परवड लेखकाने दाखविलेली आहे. ती तेग्याच्या मुळ स्वभावाशी जुळणारी अशीच आहे.

"नागी" :

"नागी" ही चन्नदटीच्या कल्लू बेरडाची नात. तेग्या तिला पळवून आणून तिच्याशी विवाह करतो. तेग्या प्रमाणेच ती धाडसी, रागीट, मायाळू, कष्टाळू आहे आणि बेरडवाडीची नायकीन आहे.

कादंबरीच्या सुरवातीलाच तेग्याची आणि तिची भेट मासे चोरण्याच्या प्रसंगातून होते. म्हणून तेग्या तिला काय वाटेल ते बोलतो. चपराक मारतो. म्हणून ती चिडते आणि त्याचीच फरशी घेऊन तेग्याच्या डोळयाला डोळा देत म्हणते, "काय वाटलं रं तुला ? पोरगी सापडली म्हणून बापईपना दावतोस ? .... तुज्या बापकोची धिंड काड जा गाडवावरून ! नागी म्हंत्यात मला. मीबी चन्नदटीच्या कल्लूचीच नात हाय. सर हो मागं." [९] असं म्हणून मासं आणि फरशी घेवून जाते. यावरून नागी स्त्री असली तरी

तरी प्रसंगी कशी चालक बनून तेग्यासारख्या पुरुषाला फसविते. अशा अनेक प्रसंगामधून नागीच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक वैशिष्टये दिसून येतात. ती धाडसी आहे. चतुर आहे. या प्रकारचे लेखकाने केलेले नागीचे चित्रण एका बेरड समाजातील स्त्रिया स्वभावाला शोभेल अशाच प्रकारचे आहे. यातून लेखकाची बेरड जमातीबद्दलची समज व्यक्त होते. इतर सामान्य स्त्रियांपेक्षा नागी बेरड स्त्री असल्याने इतर स्त्रियांपेक्षा वेगळी आहे. हे लेखकाने केलेले चित्रण स्वाभाविक स्वरूपाचेच वाटते. तसेच तेग्याने तिला लग्नाला मागणी घालताच कल्लूला ती रागाने म्हणते, "ह्या माकडाला देतूस मला ! त्वांड बग त्येचं.... गप बस म्हाताऱ्या. तुला चढली असल. खरं सांगून ठेवतू, तस काय केलंस तर खांडोळी करीन तुजी !" [१०] (पृ.७) यावरूनही नागी ही खास बेरडाची अवलाद, तिखट मिरची कशी असते हे समजते. पण तेग्याने पळवून आणताच आपल्या भवितव्याची काळजी करून नंतर आपल्या संसारात मग्न होते. यावरून ती इतर स्त्रीप्रमाणे प्रापंचिक स्त्री आहे हे स्पष्ट होते.

काळूने चुकीची वर्दी आणली म्हणून तेग्या काळूला चाबकाने मारत असतो. त्यावेळी नागी तेग्याच्या हातातला चाबूक काढून घेवून काळूचा मार वाचविते. तर गावच्या करमणूकीसाठी आपल्या गळ्यातील दागीने चिमणाला देते. पण चिमणीला दागीने देताना ती लगेच देत नाही. अनेक प्रकारे चौकशी करते. तिच्या या चौकशीतून स्त्रीस्वभावाचे लेखकाचे निरिक्षण कसे सूक्ष्म स्वरूपाचे आहे हे दिसून येते.

आपला नवरा इनामदारांच्या शब्दात अडकल्यामुळे विचित्र वागतो. या त्याच्या विचित्र वागण्याचा अर्थ सुरुवातीस नागीला उमजत नाही. तो आपल्याशी फटकेफटकेला का भांडतो, पिऊन का येतो. याचा उलगडा होण्यासाठी तिने तेग्याची विचारपूस केली, तरी शिव्या देण्यापलीकडे तेग्याने

काही सांगितले नाही. नागी मुकाटयाने हे सारे सहन करीत होती. यावरून तिची सहनशीलवृत्ती दिसून येते. आपल्या नव-यावरील प्रेमाखातर तो ताळ्यावर यावा म्हणून ती चंद्रोभावजीना बोलवून जेवन करते. पण या संधीचा फायदा घेऊन तेग्या सरोळीच्या पाटलाचा खून करतो. हे नागीला समजल्यावर ती त्याला रागाने बोलते. पण तेग्या जेंव्हा शपथेत अक्कल्याची सत्य परिस्थिती सांगतो. तेंव्हा ती तेग्याच्या अवस्थपणाचे कारण जाणून त्याच्या दु:खात सामील होते व चंद्रोभावोजीला समजावण्याचा प्रयत्न करते. पण चंद्रोजी ऐकत नाही. चंद्रोजीचाच तेग्याकडून खून होतो. तेग्याला पोलीस पकडून नेतात. मग तर नागीच्या दु:खाला पारावार उरतच नाही. तेग्या तुरुंगात अक्कल्यामुळे नागीची अवस्था वाईट होते. अशातच मल्ला निघून जातो. मग तर नागीला अदिकच दु:ख होते. आपल्या व पोराच्या पालन-पोषनासाठी कष्टाची कामे करते तसं ती तेग्या तरुंगातून सुटून आल्यावर बोलूनही दाखविते, "हेयच की, नाकडं फोडली. मोळ्या इकल्या. गवत इकलं अन् पोर जगवलं. काळू, मल्ला व्हते म्हनून सारं झालं." [११](पृ.८४) यावरून नागीने आपल्या नव-याच्या माघारी सत्वशीलवृत्तीने कसे दिवस काढले याचा प्रत्यय येतो. पण तिने इनामदाराकडे हात पसरला नाही. किंवा कोणाकडे लाचारी पत्करीली नाही. यावरून तिची कष्टाळूवृत्ती, चिकाटीपणा, चारित्र्य संपन्नता हे गुण दिसून येतात.

नागीला आपल्या मुलाच्या वाटत्या वयाची काळजी वाटते. म्हणून ती तेग्याला सांगून ईश्वराचे लग्न लगमाशी लावून देते. लग्नाच्यावेळी आपले सारे दागीने सुनेच्या अंगावर घालून तिच्यावरील प्रेम व्यक्त करते. लग्नाच्या रात्री घराला आग लागते व त्यात आपली सून सापडून भाजेल, म्हणून नागी स्वत:चा जीव धोक्यात घालून लगमाला वाचविते. ह्यातच नागीच्या मोठे-पणाची व धाडसीवृत्तीची साक्ष पटते. अशी ही बेरड जातीतील स्त्री असूनही, स्त्री जातीतील अनेक गुणांचा साठा तिच्या जवळ होता हे दिसून

A
12012

येते. तिचा चांगुलपणा, प्रेमळपणा, दुस-यासाठी स्वत:ची पर्वा न करण्याची परोपकारीवृत्ती असे नागीचे गुण दिसून येतात. चांगल्या आणि वाईट अशा दोन सांकेतिक प्रवृत्तींच्या पात्रांचे चित्रण रणजित देसाई करतात. त्यामुळे कादंबरीतील पात्रे सांकेतिक स्वभावाचीच होतात. त्यांच्या स्वभावातील बारकावा ते प्रकट करू शकत नाहीत. ढोबळपणानेच पात्रांचे चित्रण रणजित देसाई करतात असे म्हणावे लागते.

"ईश्वरा" :

"ईश्वरा" हा तेग्या बेरडाचा पोरगा. हे पात्र कादंबरीच्या दुस-या भागात आले आहे. परंपरावादी जुन्या विचाराचा तेग्या व त्याचे साथीदार आणि आधुनिक विचाराचा ईश्वरा यांच्यात विरोध दाखविण्यासाठीच हे पात्र लेखकाने निर्माण केले आहे. ईश्वराचा जन्म तेग्याला तुरुंगात नेल्यावरच होतो. मग ईश्वराला आपला बापाविषयी माहिती मिळते ती त्याच्या आईकडूनच. म्हणून तेग्या तुरुंगातून सुटून येताच आपल्या बापाच्या भेटीने तो आनंदून जातो. यावरून ईश्वराला आपल्या बापाविषयी प्रेम असल्याचे दिसते.

लहानपणी ईश्वरा बारीतल्या जंगलातल्याटापून-टापू तेग्या बरोबर हिंडतो. तसेच फरशी चालविणे, पायाने पाठीमागे दगड फेकणे, शिकार करणे या सर्व गोष्टीचे शिक्षण घेतो. यामुळे ईश्वरा आपल्या बापाप्रमाणेच धाडसी, पराक्रमी बनतो. आणि आपल्या बेरड जमातीसाठी स्वत: पुढाकार घेऊन प्रत्येक गोष्ट करतो व आपल्या आई-वडीलांनी ठरविलेल्या नागीशी लग्न करून तिचा आनंदाने स्वीकार करतो. पण लग्नाच्या रात्री घराला आग लागून त्यात नागी भाजून मरते. यामुळे ईश्वरा आपल्या आईच्या प्रेमाला कायमचा दुरावतो आणि आईचे दु:ख विसरून बेरडवाडीच्या उध्दारासाठी परत कार्याला लागतो.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सरकारी जंगल संपत्ती जळून जावू नये म्हणून ईश्वरा सर्व बेरडांना जमा करुन जंगलाला लागलेली आग विझवितो. ही बातमी सरकारी अधिका-ऱ्यांना कळताच ते ईश्वराचा सत्कार करतात व केंद्रसंचालक गुरुजी कौतुकाने त्याच्या विषयी बोलतात, "हाच तो वीर ! आज हा नसता तर सारे जंगल भस्मसात झाले असते. आपल्या राष्ट्राची केवढी संपत्ती धुळीला मिळाली असती. असेच निधड्या छातीचे वीर हवेत..." [१२] (पृ.१४१) यावरुन ईश्वराची राष्ट्रभक्ती, समाजशीलवृत्ती हे गुण दिसून येतात.

राष्ट्रभक्तीने आणि समाजशीलवृत्तीने प्रेरीत झालेला ईश्वरा सुरुवातीला सरकारी अधिकारी, त्यांचे कायदे, ध्येयधोरणे यांना भीत होता. पण हे केंद्र बेरडांच्यासाठी आहे. बेरडांचा त्यात विकास आहे. आपण तिथे जावे, नवीन विचार घ्यावेत. देशाचा उध्दार करावा म्हणून त्या दिवसापासून तो सतत केंद्रावर जाऊ लागतो. तेथे चालणारी प्रार्थना, साजरा होणारा पंधरा ऑगस्ट दिन, तिथले नवे विचार, सुधारणा या सर्वांचा स्वीकार ईश्वरा करतो. हे त्याचे गुण पाहून केंद्रसंचालक गुरुजीही त्याला आपल्या मुलाच्या स्थानी लेखतात. पण हे परंपरावादी बेरड वृत्तीच्या तेग्याला पटत नाही. म्हणून ईश्वरा त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. यावरुन त्याची समंजसवृत्ती दिसून येते.

नवीन कायदे-कानून ईश्वरा आता जाणत असतो. म्हणूनच आपली बायको जंगलात लाकडे आणण्यासाठी गेली असता, गार्डने तिला आडविले हे तेग्याला समजताच तो रागाने फरशी घेऊन निघाला असता, ईश्वरा त्याला आडवितो आणि म्हणतो, "थांब म्हाता-या, कुठंतरी खून पाडशील आन् जाशील फासावर. मागचं दिस गेलं आतां. जरा दमान घे." [१३] (पृ.१४८, १४९) असे म्हणून तेग्याला घरात कोंडून घालतो आणि केंद्रावर जावून गुरुजींना आपल्या बायकोची आब्रू गार्डने लुटल्याचं सांगतो आणि दुःखी होतो.

यावरून ईश्वरा हा जातीनं बेरड. बदला घेणं ही त्याची वृत्ती. पण स्वत:च्या बायकोची आब्रू लुटली असतानासुध्दा गप्प बसतो. हे त्याचे चांगले गुण दिसून येतात. म्हणजे रणजित देसाई आदर्शवादी पात्रांचे चित्रण करण्यात अधिक रस असणारे लेखक आहेत. ईश्वरा हा तेग्या बेरडाचा मुलगा, नव्या विचाराने त्याच्या वृत्तीत बदल होतो. आपण नवे कायदे पाळले पाहिजेत. अशी त्याची भुमिका आहे. पण स्वत:च्या बायकोवर जंगलातला गार्ड बळजोरी करतो, तेव्हा हा गांधीवादी मार्गाने तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो. हा काही स्वाभाविक स्वभावाचा बदल वाटत नाही. माणूस म्हणून प्रत्येक माणसाला काही भावना, विकार असू शकतात. ह्या सा-या भावनांवर विजय मिळवून ईश्वरा गांधीवादी मार्गाचा अवलंब करतो. त्यामागील जबरदस्त कारण मीमांसा कादंबरीत दिसत नाही. त्यामुळे ईश्वराचे चित्रण अस्वभाविक वाटते.

बेरडवाडीचा उध्दार करण्यासाठी सरकारी यंत्रणेचा फायदा ईश्वरा घेतो. हे जुन्या विचाराच्या तेग्याला पटत नाही. हे पटवून देण्यासाठी ईश्वरा त्याला म्हणतो, "मग चोरीचंच धंदं करावं म्हण की ! ते तुमच्या-बरोबरच सोपलं समज. आतं न्हाई जमायचं त्ये. आमची पोरं श्यानी हुतील. लिवाय-वाचाया शिकतील. गाव सुदरल आमचं. यंदा भाव झाली. पानी आलं. फुडं रस्ता बी हुईल." [१४] (पृ.१६२) असं आपल्या बापाला समजावून सांगतो. व आपला मुलगा सिधा याला शाळेत घालतो. तसेच गावातील बेरडांना सरकारी कामं जोडून देतो आणि बेरडवाडीचा काया पालट करतो. यावरून ईश्वराला आपले परंपरागत बेरडांचे धंदे पसंत नाहीत. आपल्या बेरड समाजाने शिक्षण घ्यावे. सुधारावे हा त्याचा सुधारणावादी दृष्टीकोन त्याच्या व्यक्तीमत्त्वातून दिसून येतो. अशा त-हेने लेखकाने आधुनिक विचार-सरणीचा ईश्वरा बेरड कादंबरीत चित्रित केला आहे. परंपरावादी तेग्या

आणि आधुनिक विचारशी जुळवून वागणारा ईश्वरा. अशा बेरडांच्या दोन पिढीतील संघर्ष लेखकाला ईश्वराच्या रूपाने चित्रित करावयाचा आहे. पण तो फारच ढोबळ आणि प्राथमिक स्वरूपाचा आहे, असे दिसते. त्यामुळे ईश्वरा ह्या पात्राच्या चित्रणात कोणताही भक्कमपणा आलेला आढळत नाही.

"चंद्रोजी":

चंद्रोजी हा तेग्याचा लहानपणापासूनचा दोस्त. जीवाभावाचा मैतर. तेग्याच्या प्रत्येक कामगिरीत मदत करणारा. पण तेग्या इनामदाराच्या वचनात अडकतो आणि चंद्रोजीच्या मालकाचा खून करतो. मग चंद्रोजीत व तेग्यात वाकडे येते आणि शेवटी जिवाभावाच्या या मैतरालाही तेग्या मारतो. इतपर्यंत चंद्रोजी बेरडाची व्यक्तीरेखा या कादंबरीत आली आहे.

हा चंद्रोजी आपल्या मैत्रीखातर तेग्याने निरोप दिल्याबरोबर तेग्याला भेटायला जातो आणि तेग्या दिसताच त्याला आनंदाने मिठी मारतो. यावरून त्याची आपल्या मित्रावरील निष्ठा दिसून येते आणि आपली ही निष्ठा, प्रेम व्यक्त करताना म्हणतो, "तेग्या, सरोळीच्या पाटलाचा म्यां नोकर न्हाई. माज्या मालकाचं आन् तुझ्या इनामदाराचं अस वाकडं. म्या माज्या मालकाला कवाच सांगितलंया, तुज्या मालकाची कळ काडली तर त्यात म्यां न्हाई म्हनून." [१५] (पृ.१०) याकरिता तो खंडोबाची शपतही तेग्याला देतो. यावरून चंद्रोजी आपल्या मित्राकरिता आपल्या मालकालाही दुय्यम स्थान देतो हे स्पष्ट होते. तसेच मैत्रीसाठी नागीला पळवून आणण्याच्या कामी तेग्याला मदत करतो. यावरूनही चंद्रोजीची मित्रनिष्ठा दिसून येते.

पण पुढे तेग्या इनामदाराच्या शब्दात अडकल्यामुळे चंद्रोजीच्या मालकाचा खून करतो. ही बातमी चंद्रोजीला समजल्यावर त्याचा राग अनावर होतो. आणि तडक तेग्याकडे येवून तेग्याच्या फरशीच्या पुराव्यावरून तुच माझ्या मालकाचा खून केलास हे पटवून देतो व त्वेशाने म्हणतो,

"मी.... मी काय ? यायचंच व्हतं तर मी असताना यायला काय धाड मारली व्हती तुला ? मी हून तुझ्या म्होरं छाती केली असती. माझ्या जिवावर धनी बिनघोर न्हात व्हता." [१६] (पृ.६१) यावरून बेरड जात आपल्या धन्याखातर स्वत:च्या जीवाची, मैत्रीला दुरावण्याची पर्वा करीत नाही हे दिसून येते. आणि भावाप्रमाणे मानलेल्या तेग्याला आपल्या विरूध्द लढण्यास तयार करतो. पण तुज्यावर मी फरशी उचलनार न्हाई असे तेग्या म्हणतातच, रागाने लाल झालेला चंद्रोजी जमीनीवर पचकन थुंकून म्हणतो, "तुजा बा उचलंल ! त्या कुत्र्याचं ऐकून माज्या धन्यावर फरशी उचलताना कुटं गेलं व्हतं शानपन ?" [१७] (पृ.६३) असे म्हणून आपल्या धन्या खातर तेग्याला आपल्या विरूध्द लढण्यास उभा करतो. आणि आपल्या मित्राच्या हातून मरण पत्करतो. आणि आपल्या कुळीची शान राखतो. तस तो तेग्याला, नागीला बोलूनही दाखवितो, "आका, तेग्या रडू नगसा. झालं ह्येच ब्येस झालं. न्हाई तर कुळीला बट्टा लागला असता माज्या. तेग्या, नागीला जप. मी हतं आलू ह्ये कुनाला ठावं न्हाई. हतंच जंगलात कुठंतरी मला पुरून टाका. सोबतीला तुजी फरशी दे. माजी फरशी तुला घे. येतो चांग भलं ..." [१८] (पृ. ६४) यावरून चंद्रोजीचा स्वाभीमान, निष्ठावंतपणा, जिवालाजीव देण्याची वृत्ती हे गुण दिसून येतात.

तेग्या आणि चंद्रोजी बालपणापासूनचे एकमेकांचे मित्र आहेत. तेग्या इनामदाराच्या बाजूने असतो. तर चंद्रोजी पाटलाच्या बाजूने असतो. एका अनपेक्षित कारणाने तेग्याला चंद्रोजीच्या मालकाला मारून टाकावे लागते. त्यामुळे यांच्या मैत्रीत वितूष्ट येते. तरीसुध्दा आपल्या कुळीला बट्टा लागू नये म्हणून तेग्याकडून आपणच मरण पत्कारतो. यावरून चंद्रोजीच्या मित्र प्रेमाची साक्षा पटते.

"काळू" :

"काळू बेरड" तेग्याचा साथीदार. रात्रीच्यावेळी जंगलातील गाड्या लुटण्याची वर्दी आणण्याचे काम काळू करत असतो. मग तेग्या इतर साथीदारांच्या सहाय्याने गाड्या लुटण्याचा धंदा करीत असतो. कांही वेळा तेग्या नसताना काळू आपल्या जबाबदारीवर गाड्या लुटण्याची कामगिरी चोख बजावीत असे. अशाच एका कामगिरीबद्दल तेग्या काळूला शाब्बासकीही देतो आणि म्हणतो, "काळू माज्या माग तूच नाईक गावचा." [१९](पृ.१४) म्हणजे काळू हा तेग्यापाठोपाठ दुसऱ्या नंबरचा बेरडांचा नाईक होता हे स्पष्ट होते. तेग्याच्या प्रत्येक कार्यात साथ देणारा आणि तेग्या सांगल तस वागणारा. पण बदलत्या परिस्थितीशी तेग्याप्रमाणेच काळूलाही जुळवून घेता येत नाही. म्हणून तोही तेग्या प्रमाणेच एकाकी पडलेला लेखकाने चित्रीत केला आहे.

एकवेळ काळू चुकीची वर्दी आणतो व ठरल्याप्रमाणे गाड्या लुटल्या जातात. पण ह्या तेग्याच्या मालकाच्या गाड्या आहेत हे समजताच काळू पश्चाताप करतो. आणि झाल्या चुकीपायी आपल्या नायकाची (तेग्याची) बोलणी खातो. चाबकाने मारही खातो. यानंतर चार दिवस तेग्याला भेटत नाही. यावरून काळूची झाल्या चुकीप्रयी पश्चाताप करण्याची वृत्ती दिसून येते.आणि तेग्याला पोलीसानी पकडून नेल हे समजताच, आपला राग माग सारून तो नागीला म्हणतो, "जाऊ दे आक्का ! माजा राग तेग्यावर न्हाई. तेघ्याच हाताखाली मोटा झालो मी. तू कसली बी काळजी करु नगस. मी बगीन काय व्हतंयाते." [२०] (पृ.७१) यावरून बेरड लोक कितीही भांडले-सवरले तरी संकटकाळी एकमेकाना मदत करतात हे काळूच्या बोलण्यावरून समजते. तसेच तेग्याला सोडविण्यासाठी नागीला शपतही देतो, "नागाक्का ! ह्यो इनामदाराचा सबूद न्हवं, बेरडाचा हाय ! जीव जाईल पन सबूद जानार न्हाई." [२१] (पृ.७१) अस म्हणून नागीला धीर देतो आणि बेळगावला जावून चांगला वकील देवूनतेग्याचा फास वाचवितो. यावरून काळूचा प्रामाणिकपणा,

हुशारी, चालाक आणि धाडसी हे गुण दिसून येतात आणि अकरा वर्षानं तेग्या सुटून येताच आनंदाने त्याला कडकडून भेटतो. आणि त्याची अवस्था पाहून डोळ्यात पाणी आणतो. यावरुन काळूची आपल्या नायकावरील प्रेम, निष्ठा, आपूलकी हे गूण दिसून येतात.

तेग्या तुरुंगात असताना गावची जबाबदारी काळूच सांभाळीत होता. यावरुन प्रसंगी जबाबदारी, नेतृत्व पेलण्याची ताकद काळूच्या अंगी होती हे स्पष्ट दिसते व तेग्या परत येताच आपली जबाबदारी त्याच्यावर सोपवितो. आणि पाटच्या भावाप्रमाणे सावलीसारखा तेग्याच्या मागे राहतो. जेंव्हा तेग्याचे घर पेटते, तेंव्हा तेग्याला, ईश्वराला व लगमाला आपल्या घरात आश्रय देतो आणि तेग्याच्या दुःखात सामील होतो. यावरुनही काळूचे तेग्यावरील प्रेम दिसून येते.

तेग्या प्रमाणेच काळूलाही ईश्वराचे आधुनिक विचार पटत नाहीत. तस तो तेग्याला बोलूनही दाखवितो, "तेग्यादा ! कोन ऐकतंय आपलं ? कशाला इचारतोस तू ? पैक्यामागं लागल्यात सारी." [32](पृ.१५६) म्हणजे परंपरावादी बेरडवृत्तीच्या काळूलाही हे नवे विचार पटत नाहीत हे दिसून येते. तसेच काळू आजारी असतो, म्हणून तेग्याला त्याला औषध घ्यावयास सांगतो. त्यावर काळू त्याला म्हणतो, "सकाळला ईश्वराने गोळ्या आनून दिल्या. खरं तेग्यादा, आमी काय वशिदवा बरी व्हनारी मानस न्हवं. कुठंतरी झाडाच्या पालापाचोळा खाऊन टान् व्हनारे गडी आम्ही ! कंदी असल्या गोळ्या खाऊन बर व्हनार हाय व्हय ?" [23] (पृ.१९२) याद्वारे आपली झाडपाल्याची औषध किती श्रेष्ठ असतात हे काळू पटवून देतो व सगळी गाव सोडून सरकारी कामधंद्यासाठी गेली तरी आपण हे गाव सोडून जायचं नाही. हे ही तेग्याला पटवून सांगतो. यावरुन काळूचे आपल्या गावावरील प्रेम दिसून येते. अशा प्रकारे काळू तेग्याचा साथीदार आहे. जुन्या पिढीतला आहे. त्यामुळे परंपरावादी विचाराचा आहे. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेता

न आल्याने तो देखील तेग्याप्रमाणे एकाकी पडतो. ही मांडणी सुसंगत वाटावी अशीच आहे. तसेच काळूच्या व्यक्तिचित्रणातून बेरड समाजातील संघिकपणा, एकजूटपणा याचेही दर्शन आपणास दिसते. आपल्या म्होरक्या-वर निष्ठा ठेवण्याची जी वृत्ती बेरडामध्ये असते. त्याचा प्रत्यय काळूच्या स्वभावातून आपणास येतो, त्यामुळे काळूचे चित्रण प्रातिनिधिक स्वभावाचे दिसते. बेरड लोकांची वेगवेगळी वैशिष्टये चित्रित करण्याचा लेखकाचा दृष्टी-कोण असल्याने काळूचे चित्रण त्या दृष्टीकोणाशी सुसंगत वाटावे अशाच प्रकारचे आहे असे म्हणता येईल.

"मल्ला" :

"मल्ला" हा तेग्याचा मामा. तेग्याच्या आईबापाच्या मृत्यूनंतर तेग्याचा सांभाळ करणारा. आपल्या जुन्या विचारानुसार बेरडवाडीला योग्य सल्ला देणारा. आणि तेग्याच्या हिताची काळजी घेणारा असा हा म्हातारा मल्ला लेखकाने चित्रित केला आहे. कादंबरीच्या सुरवातीलाच तेग्याने चंद्रोजीला फरशी दिली असे सांगताच, "..... पोरा फरशी दिलीस तू ? अरं बेरड जीव दील पन फरशी नाय देनार." २४(पृ.४) यावरून जीवापेक्षाही फरशीला बेरड लोकांनी जपली पाहिजे हे मल्लाच्या बोलण्यातून दिसून येते व परत अशी चूक करु नको असं तेग्याला समजावून सांगतो. आणि तेग्याचा नागीविषयचा मनातील विचार हेरून त्याचे लगीन नागी बरोबर लावून देतो व दोघांनाही सुखाने संसार करण्याचा योग्य सल्लाही देतो. यावरून मल्लाची दुस-याला समजावून घेण्याची वृत्ती तसेच भले करण्याची वृत्ती हे गुण दिसून येतात.

तेग्या जेंव्हा इनामदाराच्या शपथेत अडकून विचित्र वागतो. दारु पितो. तेंव्हा मल्ला समजूतदार विचाराचा असल्यामुळे त्याच्या ह्या वागण्याचे कारण जाणून त्याला समजावण्याचा प्रयत्न करतो. तसे तो नागीला बोलूनही दाखवितो, "पोराला कसला तरी घोर लागलाय. न्हाई तर यवढा पिनार

न्हाई त्यो. मी वळवतो त्याला." [२५](पृ.४८) असं म्हणून नागीला धीर देतो आणि पोलीसानी तेग्याला पकडून नेताच मल्ला पूर्ण ढासळतो. आणि तेग्याला सोडविण्यासाठी इनामदाराकडे येतो. पण इनामदार त्याचा अपमान करतो. हा आपमान सहन करुन नागीला घडलेली हकीगत सांगतो, "तेग्याला बुडवल ग धन्यानं .... इश्वासनं गळा कापला त्येचा...." [२६](पृ.७०) असं सांगुन तेग्यावरील प्रेम व्यक्त करतो व काळूला घेवून बेळगावला जावून मोठा वकील देवून तेग्याचा फास वाचवितो. यावरुन मल्लाची तेग्यावरील निष्ठा, प्रेम, आपुलकी दिसून येते. असा हा म्हातारा मल्ला प्रेमळ स्वभावाचा असल्याचे दिसते. तेग्यावर जिवापाड प्रेम करणारा, त्याला संकटातून वाचविण्याचा प्रयत्न करणारा, तेग्याच्या माघारी त्याच्या बायकोची मनापासून काळजी करणारा. अशी अनेक गुणवैशिष्टये लेखकाने मल्लाच्या व्यक्तिचित्रणातून चित्रि चित्रित केली आहेत.

"आप्पासाहेब इनामदार":

"आप्पासाहेब इनामदार" हे पात्र तेग्या बेरडाचा मालक म्हणून या कादंबरीत आले आहे. सुरवातीस ते तेग्याबरोबर विश्वासाने वागतात. म्हणून तेग्याला दरवर्षी दसऱ्याला खुशालीसाठी बोलवत. दसऱ्याची खुशाली म्हणून दहा रुपये व पटका आप्पासाहेब तेग्याला द्यायचे व तेग्याला आग्रह करुन जेवण देत. असे हे इनामदार सुरवातीस प्रेमळ वाटतात. पण तेग्याने आपल्या गाडया लुटल्या म्हणून तेतेग्यावर राग धरुन असतात. आणि त्याच संधीचा फायदा घेऊन तेग्याला शपथेत पकडून सरोळीच्या पाटलाचा खून करावयास सांगतात. यासाठी तेग्याला तो सांगतो, "त्याची काळजी करु नकोस. तेग्या तुला एक सोडून दहा वकील देईन. त्यातूनही तुरुंगात गेलास तर तुझं घर माझं म्हणोन. ज्या दिवशी कामगिरी पुरी करशील त्या दिवशी तुझ्या घराला पाच हजार रुपये पाठवून देईन. मग तर झालं ! मागची काळजी करु नकोस." [२७] (पृ.४७) असं विश्वासात घेवून तेग्याला सांगतो. पण नंतर तो तेग्याला फसवितो. तेग्याने कामगिरी पूर्ण केल्यावर त्याला शिक्षा होते,

तरी इनामदार त्याची काही चौकशी करीत नाही. उलट विनवनी करावयास आलेल्या मल्लाचा आपमान करुन हाकलून देतो. अशा त-हेने विश्वासाने इनामदाराने तेग्याचा गळा कापलेला असतो. म्हणजे इनामदार लोक स्वत:च्या फायद्यासाठी बेरड जमातीचा उपयोग करुन घेत असतात. याचे चित्रण लेखकाला करावयाचे आहे. हे सामाजिक वास्तव सांगण्यासाठी इनामदारासारखी माणसे बेरड लोकांची कोणत्या प्रकारे फसवणूक करीत असतात. त्यांचे शोषण कशाप्रकारे करीत असतात. याचे चित्रण लेखकाने चांगल्या प्रकारे केले आहे. इनामदारांच्या वागण्यातून त्याच्या स्वभावाचे अनेक पैलू स्पष्ट होतात. त्यांचा मतलबीपणा, बेरडाची आपल्यावरील निष्ठा पाहून त्याचा स्वार्थीपणाने उपयोग ते करुन घेतात. आपल्या परस्परातील भांडणामध्ये नाहक बळी जाणा-या बेरडांची ते अजिबात पर्वा करीत नाहीत. हा त्यांचा स्वार्थीपणा कोणत्या प्रकारचा होता याचे दर्शन इनामदाराच्या चित्रणातून लेखकाने घडविलेले दिसते.

पुढे तेग्या सुटून येतो. हे इनामदाराला कळताच त्याचा चेहरा काळवंडतो, घशाला कोरड पडते. तेग्या सुटला कसा याचे कोडे त्यांना सुटेना. कारण तेग्याला जन्मठेप झाली होती म्हणून त्यांनी उसासा सोडला होता. स्वत:शी ते हसले होते आणि तेग्या कधीच परतणार नाही हे ऐकून त्यांना समाधान वाटले होते. आणि याच समाधानावर त्यांनी अकरा वर्षे आनंदाने काढली होती. यावरुन इनामदारांना आपण तेग्याला फसविले याची भिती वाटते हे स्पष्ट होते. व तेग्या आपणास गय करणार नाही याचीही भिती इनामदाराला असते. आणि तेग्या जेंव्हा समोर येवून सगळ्या गोष्टींचा उलगडा करुन खूनाची धमकी देतो. मग तर इनामदार पूर्ण घाबरतो. यावरुन इनामदाराच्या भित्रेपणाची साक्ष पटते. तसेच इनामदार कपटी आहे, मग्रूर स्वभावाचा आहे. स्वत:च्या फायद्यासाठी ते कुणाचीही पर्वा करीत नाहीत. ते मतलबी असतात. अशी अनेक गुणवैशिष्ट्ये इनामदाराच्या चित्रणातून स्पष्ट होतात.

"बारी" सामाजिक चित्रण:

सामाजिक चित्रणामुळे ग्रामीण कादंबरीत भरीवपणा प्राप्त होतो. "बारी" कादंबरीतही सामाजिक चित्रण आले आहे. ग्रामीण परिसरात एक लहानसा भाग असलेले बेरड जमातीचे परंपरागत जीवन. स्वतंत्र्यप्राप्तीनंतर बेरडांच्या जीवनात होणारे बदल आणि या जमातीला असणारी भवितव्याची काळजी यातूनच बेरडांच्या सामाजिक जीवनाचे चित्रण दिसते.

या बेरडाचा मुख्य व्यवसाय म्हणजे सामुदायिकरित्या रात्रीच्यावेळी जंगलाचा आधार घेऊन गाडया लूटणे. याकरीता तेग्याला आपला नायक करतात व त्याच्या विचारानुसार सर्वजन वागतात. म्हणून तेग्या काळू बेरडाकडे वर्दी आणण्याचे काम सोपवितो. त्याप्रमाणे काळू वर्द्या आणित असतो. काळूने वर्दी आणताच तेग्या सर्व बेरडांना एकत्र जमवितो. आणि आपल्या साथीदाराना योग्य सुचना देवून गाड्या लुटतो. याकरिता सर्व बेरडांनी ठरलेल्या वेळी, ठरलेल्या ठिकाणी जमणे. कामगिरी करण्यासाठी योग्य ती काळजी घेणे आणि कामगिरी फत्ते करुन मिळालेले पैसे, दागिणे वाटून घेऊन त्यावर आपली गुजराण करत असतात. यातून बेरडांची जीवन जगण्याची पध्दती दिसून येते.

या बेरडांचे परस्परातील संबंध हे विशिष्ट नात्यागोत्यानी बांधले गेल्यामुळे जीव्हाळ्याचे वाटतात. सुरवातीलाच तेग्याला घरी यायला उशीर झाला म्हणून त्याचा मामा मल्ला त्याची वाट बघत बसलेला असतो आणि तेग्या येताच त्याची सर्व विचारपूस करतो. तेंव्हा तेग्या आपला लग्नाविषयी-चा विचार मल्लाला बोलून दाखवितो. मग मल्ला तेग्याला घेऊन कल्लूकडे येवून नागीला मागनी घालतो. कल्लूही तेग्याच्या वडीलाचा दोस्त असल्यामुळे नागीला द्यायला तयार होतो. यावरुन बेरडांचे परस्परातील संबंध जीव्हाळ्याचे असल्याचे दिसून येतात. तसेच तेग्याची आणि चंद्रोजीची मैत्री लहानपणापासून असल्यामुळे तेग्याने निरोप देताच चंद्रोजी त्याला भेटायला येतो आणि आपल्या

मित्रासाठी नागीला पळवून आणण्याच्या कामी मदत करतो. म्हणजे बेरड लोकांचे एकमेकावर निष्ठा, प्रेम असल्यामुळे सत्कार्य करीत असतात. तसेच हे बेरड लोक संकटकाळी एकमेकाना मदत करीत असतात व परस्परांच्या सुख-दु:खात सामील होत असतात. याचेही चित्रण "बारी" कादंबरीत आले आहे. तेग्याला पोलीसानी पकडून नेताच सारे बेरड दु:खी होतात. आणि काळू मल्ला तेग्याच्या मदतीला धावून जावून तेग्याचा फास वाचवितात. तसेच तेग्या तुरुंगात असताना त्याच्या बायकोला धीर देवून मदत करतात. यावरुन त्यांची संकटकाळी एकमेकाला मदत करण्याची वृत्ती दिसून येते आणि तेग्या सुटून येताच त्याला सर्वजन भेटायला येवून त्याची विचारपूस करतात व परत आपला नाईक म्हणून गावची जबाबदारी त्याच्यावर टाकतात. यावरुनही बेरडांची एकमेकां-वर असणारी निष्ठा, प्रेम दिसून येते. तसेच तेग्याला आपला मामा गेल्याचे कळताच त्याला अतिशय दु:ख होऊन तो ढसढसा रडतो. यावरुनही बेरडांचे नात्यागोत्याचे संबंध किती जिव्हाळ्याचे असतात हे दिसून येते. तेग्याच्या घराला आग लागते आणि त्यात नागी भाजून मरते. म्हणून सारी बेरडवाडी दु:खाने हळहळते. आणि काळू सारखे बेरड तेग्याचे नवीन घर उभाराहीपर्यंत आपल्या घरात त्याला राहाण्याची सोय करतात. यावरुनही संकटकाळी हे बेरड लोक एकमेकाना कसे मदत करतात याचे चित्रण आले आहे. यावरुन बेरडांची समुह भावना दिसून येते.

हे बेरड लोक आसपासच्या गावच्या इनामदार, पाटील यासारख्यां श्रीमंत लोकांच्या पदरी असतात. त्यामुळे संकटकाळी, वेळप्रसंगी ते आपल्या मालकाला मदत करीत असतात. हे श्रीमंत लोकही सणासुदीच्या दिवशी बेरडांना घरी बोलवून त्यांना जेवण घालतात. आणि पेरावा करुन, पैसे देवून परत पाठवतात. म्हणूनच तेग्या बेरड आप्पासाहेब इनामदारांच्या पदरी असतो. तर तेग्याचा मित्र चंद्रोजी बेरड सरोळीच्या पाटलाच्या पदरी असतो. पण इनामदार आणि सरोळीचा पाटील यांच वाकड असल्यामुळे तेग्या आणि चंद्रोजी या दोन बेरडातही फूट पडते. म्हणजे आपल्या मालकाकरिता बेरड

लोकांच्यातही कशी फुट पडते आणि त्यामुळे त्यांचे संबंध कसे तुटतात याचे चित्रण बारीत कादंबरीत आले आहे. तसेच या बेरड लोकांचा आसपासच्या गावातील व्यापारी, शेटजी यांच्याशीही संबंध कसा येतो याचेही चित्रण आले आहे. बेरड लोक आपण लुटलेले दागीने, पैसे या व्यापाऱ्याजवळ, शेटजी-जवळ ठेवून, लागेल तसे त्यांच्याकडून धान्य, पैसे नेत असतात. कांहीवेळा हे व्यापारी, शेटजी लोक जादा धान्य, पैसे या बेरडांना देतात. पण त्यांना रिकाम्या हाताने पाठवत नाहीत. याकरीता बेरडही त्यांचा दिला शब्द पाळतात. व संकटकाली त्यांना मदत करतात. म्हणजे हा बेरड समाज पांढरपेशी वर्गापासून दूर-फटकून राहात असला तरी या लोकांशी त्यांचा या ना त्या कारणाने वारंवार कसा संबंध येतो याचे चित्रण लेखकाने केले आहे.

बेरड लोक जसे वैयक्तीक संकटाच्यावेळी एकत्र येतात. तसेच सार्वजनिक संकटा-च्यावेळीही एकत्र येतात आणि ते संकट दूर करतात. जंगलाला जेंव्हा आग लागते तेंव्हा साऱ्या बेरडांची बायकामुले, म्हातारी-कोतारी माणसे, तरणी-ताठी, पोरेबाळे ही सर्वजण मिळून रात्रभर वणवा विझवितात. आणि सरकारचं जंगल वाचवितात. यावरून त्यांची राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रावरील प्रेम आणि समूहभावना हे गुण दिसून येतात.

बेरडांच्या जीवनात जसे दु:खाचे प्रसंग येतात. तसे आनंदाचे प्रसंगही येतात. आपल्या बारीतील बेरडांची करमणूक घडविण्यासाठी तेग्या, काळू गावात खेळ करावयाचे ठरवितात. त्यासाठी चिमना नाचणारीचा खेळ ठरवतात. गावात खेळ होणार म्हणताच लहान मुलापासून म्हाताऱ्या माणसापर्यंत सारी बेरडवाडी कामाला लागते. खेळासाठी नवीन मंडप उभा करतात. खेळाची जागा स्वच्छ करतात. खेळाच्या दिवशी सर्व बेरड खेळ पाहण्यासाठी आनंदाने जमतात आणि खेळाचा आनंद रात्रभर पार पाडतात. अशा प्रकारे देवाच्या खेळाच्या निमित्ताने बेरड लोक आपल्या परंपरागत श्रध्दा, रूढी, देवभोळेपणा

यावर विश्वास ठेवतात आणि हा खेळाचा समारंभ सामुदायीकरित्या घडवून आणतात. तसेच लग्नासारख्या धार्मीक विधीच्यावेळी हे बेरड एकत्र येवून कसे कार्य करतात. याचेही चित्रण या कादंबरीत आले आहे. ईश्वराचे लग्न करण्यासाठी तेग्या काळूला घेवून नङ्गाट्टयाला जातो व तेथे सुबय्या बेरडाची पोरगी पाहून लग्न ठरवितात आणि बेरड जमातीच्या रितीरिवाजाप्रमाणे ईश्वराचे लग्न लगमाशी मोठया थाटामाटात होते. याकरिता दररोज तेग्याचे घर माणसांनी भरत होते. तेग्या, नागी आलेल्या पाहूण्यांची सोय करीत होते. वरातीसाठी काही लोकांनी गाडी सजविली. वरात काढण्या-साठी वाजंत्री मुले खेळत होती. वरातीत सर्वजन सामील झाले होते. लग्नाला आसपासच्या गावचे बेरडही आले होते. तेग्याला सर्वजन नावजीत होते अशा प्रकारे सर्वसामान्य लोक लग्नविधी जसा पार पाडतात त्याचप्रमाणे बेरड समा-ज्यातही हा लग्नविधी समारंभ, त्यांच्या परंपरागत रिवाजाप्रमाणे सामुदायी-करित्या कशा प्रकारे पार पाडला जातो याचे चित्रण लेखकांनी केले आहे.

बेरडांचे परंपरागत जीवन आणि बदलते जीवन याचेही चित्रण "बारी" कादंबरीत आले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर ईश्वरासारखे आधुनिक विचाराचे बेरड बदलत्या जीवनाचा स्वीकार करतात. त्यामुळे त्यांचा संबंध सरकारी अधिका-याशी आणि पांढरपेशी वर्गाशी येतो. त्यामुळे केंद्र संचालक गुरुजी बेरडांचा उध्दार व्हावा म्हणून, बेरडवाडीत येवून सर्वांना एकत्र बोलवून सरकारी ध्येय-धोरणांचा फायदा घेण्यास सांगतात. त्यासाठी सरकारणे उघडलेले केंद्र, सोसायटी, औषधे, शाळा, सरकारी कामधंदा या सर्वांची माहिती देतात व या गोष्टीचा फायदा घेण्यास सांगतात. यामुळे ईश्वरा व त्याचे साथीदार प्रभावीत होतात. आणि आधुनिक पांढरपेशी लोकांच्या विचाराचे वारे त्यांच्या अंगात संचारते. त्यामुळे ते बदलत्या सामाजिक परिस्थितीकडे ओढले जातात. आणि सरकारी ध्येय धोरणांचा

फायदा घेतात. त्यामुळे बेरडांचा संबंध पांढरपेशी लोकांशी सतत येतो. यामुळेच परंपरागत बेरडांच्या जीवनात बदल होतो. म्हणून आधुनिक विचाराने प्रेरीत झालेला ईश्वरा व त्याचे तरुण साथीदार चोऱ्या, दरोडे, खून या वाईट मार्गापासून अलिप्त राहातात आणि सरकारी ध्येय-धोरणांचा फायदा घेतात व स्वत:च्या पायावर उभे राहतात. पण हे जुन्या विचाराच्या तेग्या, काळू सारख्या बेरडांना पटत नाही. म्हणून जुन्या विचाराचे बेरड आणि नव्या विचाराचे बेरड यांच्यात संघर्ष निर्माण होतो अशा तऱ्हेने बेरडांचे परंपरागत जीवन आणि बदलते आधुनिक जीवन याचे चित्रण लेखकाने केले आहे. अशा विविध स्वरूपात "बारी" कादंबरीतील बेरड लोकांच्या जीवनचित्रणातून सामाजिकतेचे चित्रण आले आहे.

## "बारी" भाषाशैली :

"बारी" कादंबरी ज्या अनेक कारणांनी मराठी वाङ्मयात वेगळी ठरली. त्यामध्ये तिची भाषाशैली हे एक तिचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे. आनंद यादव यानी रणजित देसाई यांची मुलाखत घेतली त्यामध्ये ते सांगतात, "आपल्या इनामीची गावे आहेत तरी कशी हे पाहाण्याच्या उद्देशाने मी "बारी" मधील तेग्याला बरोबर घेऊन मुक्काम, दर मुक्काम करत-करत, बेरडांबरोबर हिंडत फिरत, खात-पीत, वस्ती करत चाळीस गाव हिंडलो आणि त्यांच्या स्वभावाचा प्रचंड अनुभव आला."[२८] अशा तऱ्हेणे रणजित देसाई यांनी बेरडांच्या बरोबर हिंडताना, खात-पीत असताना त्यांच्या बोलीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन आणि नेमकी तीच बोलीची लकब कादंबरीत वापरलेली दिसते. त्यामुळे बेरडांच्या भाषेची अनेक वैशिष्टये व्यक्त झालेली दिसतात.

## बेरडांच्या बोलीतील वाक्प्रचार:

कानोस घेणे, जीव घाबरा होणे, धीर सुटणे, मान कापणे, अंगावर वीज कोसळणे, घोर लागणे, चिंतातूर होणे, जिवाचे पाणी-पाणी होणे,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पांग फेडणे, कानोसा घेणे, उसासा सोडणे, जिवाची घालमेल उडणे, जीव भांड्यात पडणे, धडकी भरणे, नजरेला नजर भिडणे, तोंडाला पाणी सुटणे, अंग शहारणे, जिवात जीव नसणे, जिव खालीवर होणे, धाब दणानने, बोबडी वळणे, डोक्यात विचाराचे थैमान घालणे, चुटपुट लागणे, काळीज फाटणे, डोळ्याला डोळा न लागणे. असे मराठी भाषेत प्रचलीत असणारे अनेक वाक्प्रचार बेरडांच्या बोली भाषेत लेखकाने वापरलेले आहेत.

बेरड लोक सहज बोलता-बोलता म्हणींचा वापर करतात, करावं तसं भराव (पृ. ६९), कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता (पृ.११९), जकडं फुडा थोडा तकडं मुलूख थोडा (पृ.१५८), गावचंव तीन तेरा झालं (पृ.१८७) अशा कितीतरी म्हणी "बारी" कादंबरीत आल्या आहेत. अशा म्हणीतून बेरडांच्या मनाचा आविष्कार स्वाभाविकपणे होतो. तसेच बेरडांचे लोक-व्यवहार, प्रादेशिक समज यांचाही प्रत्यय येतो.

बेरडांच्या भाषेची धाटणी:

"आय भुत्रूर ! जेवान केलं आन् चिलीम ओढत बसलुया. तुजी वाट बगत." (पृ.४), "तुझ्या बानं दरोड्यात माझ्या मांडीवर परान सोडला." (पृ.७), "हतच येतू मी चांग भलं !" (पृ.११) पाठीवं धिरडं केलंस त्येच्या." (पृ.२५), "सकाळच्या पा-याला गाळी कशास दितूस ?" (पृ.३४), "सरकार बेरडाचा सबूद आन् शापत येगळी न्हाई. दिली शापत." (पृ.४६), "नागी घालणी घालूस पायजे." (पृ.७२), छा लई चकोट हाय माजा बा." (पृ.७९), "यंव करंन त्यंव करंन." (पृ.८७), "पैक्याची किंमत न्हाय मला. जावा तुमी, बिनगोर न्हावा." (पृ.९०)

अशा प्रकारच्या वाक्यातून बेरडांच्या भाषेतून ग्रामीण भाषेची अनेक वैशिष्ट्ये प्रकट होतात आणि हीच त्यांच्या बोली भाषेची खास धाटणी आहे.

### बेरडांच्या बोलीतील शिव्या:

"तुझं मासं ? ठवल्यात तुझ्या बानं .!" (पृ.२), "ह्या माकडाला देतूस मला ? स्वांड बग त्येचं..." (पृ.७), "अरं तेग्या ती रांड पळाली रं.!" (पृ.१४), "च्या .. यला.! बस की गप." (पृ.३४), "कुनाला ? त्या सटवीला?" (पृ.३९), "मुड्दा बसला सरकाराचा.! कवा झालं हे ?" (पृ.५६), "इची भन नेऊन – मला सांगतियास ?" (पृ.५८), "तुजा बा उचलंल.! त्या कुत्र्याचं ऐकून माज्या धन्यावर फरशी उचलताना कुठं गेलं व्हतं शानपन ?" (पृ.६३), मुड्दा गसवला त्येचा." (पृ.७१), "हरामखोर .! मला उलट विचारतोस ?" (पृ.८७), "कशापायी उलथल्यात हतं त्ये ?" (पृ.१७६), पोटासाठी शेण कुठं खात नाहीस भडव्या." (पृ.१७९).

या शिव्यातून बेरडांचे वागणे, स्वभाव, बोलण्याचा रोख, राग लोभाच्या छटा याचे दर्शन होते.

### बेरडांच्या बोलीतील शब्दांचे वैशिष्टये:

संधोव, मक्ता, थोराड, पिंड, परान, म्या, सबुद, आरबाट, खर्चीबगून, आपूवाईनं, गाळी, क्वाँग, देऊस, थिरड, उभी, ढोसीत, हतच बसा, सबुरीन, जिम्मेदारी, रोडावलास, अपूनबी, सायब, किरपेनं, दाल्ला, पैक्याची, बिन-गोर, तवलीत, परपटी, गोजाळ, साटनं ये, म्या धाड्तू, हतंतरी, दास्तान, रस्त्यात, सांजच्या पारापासनं, हुंदड, ठुशी, घुमाट सुटली, हतनं, रिक्क, मगा आलू यासारख्या बेरडांच्या बोलीतील खास शब्दांनी कादंबरीतील प्रसंगाना आणि वातावरणाला उठावदारपणा आणला आहे.

### उपमाचा योग्य वापर:

अशी रूपाने आणि गुणांनी तिखट पोरगी तेग्याने आजवर पाहिली नव्हती. (पृ.४).

गपकन् वाटलं सिद्दाचं भूतच.! (पृ.६)

नागी म्हंजे आग हाय नुसती. (पृ.७) "मामा, अरं ढान्या वाग जाळ्यात गावला न्हव ?" (पृ. ९). आग, पन अशी कोंबडीवानी का बसलीयास ? (पृ.१७). "अक्री सोन्यावून पिवळी धमक, दुकानातल्या बाव्लीगत कशी अगदी मोरागत नाचत व्हती." (पृ.२८). अंगावर वीज कोसळली असती तरी तेग्या डगमगला नसता. पण त्या शब्दांनी त्याचा धीर सुटला." (पृ. ४६). "मी तेग्या हाय. गावचा नाईक हाय.... इनामदाराचं कुत्रं हाय...! कुत्रं हाय ...!" (पृ.४७).

"एखादा वृक्ष कोसळावा तसा चंद्रोजी खालच्या पाचोळ्यात कोसळला."(पृ.६४).

"मासळी प्रमाणे नागी तडफडत होती." (पृ.१२०)

"शिंगात किडे पडलेल्या बैलासारखा तो अस्वस्थ झाला होता." (पृ.२०२)

या उपमाद्वारे बेरड जीवनातील बारकावे लेखकांने टिपले आहेत. या उपमा प्रादेशिक वैशिष्टयातून आलेल्या आहेत.

<u>बेरडांच्या गाण्यातून व्यक्त होणारी भाषिक वैशिष्टये:</u>

"कसं येऊ मित्रा मी तुज्याबरोबर,
चिंध्या लोंबल्यात अंगावर फार." (पृ.३५).

"शेतकरी दादा, कामकरी दादा, देशाची हाक तुम्हा हाय हो.!"
(पृ.१६४).

या मराठी गाण्या बरोबरच महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील "बारी" हा परीसर असल्याने कन्नड भाषेचा परिणामही खालील गाण्यातून दिसून येतो.

"नदी बाळया होगुनू पैंगा -
मारवाडी अंगड्यागा." (पृ.३५)

"संध्या बाळया वारिगी योगियेगा -
होगलदु पैंगा इरावरा.

जमाखर्च लेंका बारियावर." (पृ.४०)
"नी याक गंगा येन अंती.।
नीन्न मॅली नान भीजो..." (पृ.१७७)
"करसिद कारणेनू कांता। हळ्ळा दिंदली
सरशी जा दळू नवने.। जसको मिलमं जुळगा
सुलबाळी यम् सुळझाडू वे.। अखातंत गौरी
कुवरणीगे बी प्रीया बालकने।" (पृ.४१)

अशा प्रकारच्या कानडी गाण्याबरोबरच भाकरी, कुंची, कांबळे, अक्का, चाकरी, धिरडं, घालणी, रिक्क, दास्तान, तवली, खर्ची बगून, क्वॉग, अक्षी, रोडावलास, गोजाळ, पिंड हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील शब्द कादंबरीत आले आहेत.

या कादंबरीचे लेखन ग्रामीण भागातील बेरडांच्या जीवनाचे चित्रण करणारे असल्यामुळे, त्या समाजाची बोली चटकन डोळ्यात भरते. म्हणून "प्रादेशिकता प्रथम जाणवते ती भाषेमुळे."[२९] असं ल.ग. जोग यांनी जे म्हटले आहे. याची प्रचिती "बारी" कादंबरीच्या भाषाशैलीच्या बाबतीत दिसून येते.

"बारी" निवेदन:

"बारी" कादंबरीतील निवेदन हे तृतीय पुरुषी निवेदन आहे. या कादंबरीतील आप्पासाहेब इनामदार, सरकारी अधिकारी आणि केंद्रसंचालक गुरूजी यांचे संवाद शहरी भाषेतील आले आहेत. बाकी संपूर्ण संवाद हे बेळगाव जवळील सुळगटीच्या जंगलात राहणाऱ्या बेरडांच्या बोली भाषेमधील आहेत. संवादासाठी वापरलेल्या बोलीमुळे रणजित देसाई यांनी चित्रित केलेल्या बेरडांच्या जीवनाचा कस चांगल्या प्रकारे झाल्याचा प्रत्यय येतो.

तेग्या-नागी यांच्या सुरवातीच्या भेटीपासून शेवटी तेग्याचा नातू "सिवा" तेग्याला कहानी सांगतो. इथेपर्यंतचे बेरडांचे पूर्ण संवाद त्यांच्या बोलीतीलच आले आहेत. तेग्याच्या व इतर बेरडांच्या जीवनात जे जे घडते, त्यांच्या भावविश्वात ज्या उपथापालथी होतात याकरिता रणजित देसाई यांनी जी भाषा वापरली आहे. ती बारीतील बेरडांची खास बोली आहे. तसेच बेरडांच्या मनांचा, स्वभावांचा अविष्कार करण्यासाठी त्याच्यांच बोलीचा उपयोग केलेला आहे. शिवाय बेरडांच्या जीवनाचे चित्रण करण्यासाठी निवेदनामध्ये त्यांनी बोलीतील शब्दांचा उपयोग केला आहे. तसेच आधुनिक ईश्वरा व त्याचे साथीदार आणि परंपरावादी तेग्या व त्याचे जोडीदार यांच्यातील अंतर्गत ताण-तणावांचे दर्शन घडविण्यासाठी रणजित देसाई यांनी पात्राहून वेगळी भूमिका घेऊनच निवदन केले आहे. या संदर्भात डॉ. गो.मा. पवार यांचे मत विचारात घेणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, "ग्रामीण समाजातील व्यक्तींचे वर्तन साहित्याच्या पातळीवर समजून सांगण्यासाठी, ग्रामिण जीवनातील अंतर्गत तणावांचे दर्शन घडविण्यासाठी, ग्रामीण व्यक्तींच्या वर्तनातील सुसंगती-विसंगती दाखवून, जीवनार्थ प्रकट करण्यासाठी लेखकाने पात्राहून वेगळी भूमिका घेऊन निवेदन करणे अपरिहार्य असते."[३०] नेमके हेच सूत्र रणजित देसाई यांनी "बारी" कादंबरीच्या निवेदनामध्ये वापरले आहे. "बारी" कादंबरीतील निवेदनाची भाषा ही पात्राच्या भाषेहून निश्चितच वेगळी दिसते. म्हणजे रणजित देसाई यांनी संवादासाठी ग्रामिण भाषा व निवेदनासाठी नागर भाषा वापरली आहे.

## सारांश:

उपेक्षीत बेरड जातीचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. बेळगाव जवळील तुतगट्टी गावाला जे घनदाट जंगल लागते. त्या जंगलात राहणाऱ्या बेरडांच्या समूहजीवनांची ही कहानी आहे. त्या जंगलाचा आधार घेऊन

वाटमाऱ्या करणाऱ्या बेरडांच्या पारंपरिक जीवनाला बदलत्या काळात कसा तिडा पडतो. या चित्रणाद्वारे "बारी" कादंबरीचे कथानक साकार झाले आहे.

स्वातंत्र्यानंतर बेरड जमातीसारख्या मागासलेल्या लोकांच्याकडे सरकारची कृपादृष्टी वळली. या पार्श्वभूमीवर बेरड जमातीच्या जीवनातील पारंपरिक मूल्ये कशी नष्ट होतात. हाच या कादंबरीचा मुख्य आशय आहे.

"बारी" कादंबरीतील व्यक्तीचित्रणाचे वैशिष्ट्ये म्हणजे, विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट जातीचा गुणधर्म म्हणून खून, दरोडे, लुटमार करणाऱ्या बेरडांचे परंपरावादी विचार. आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदलते विचार. यातूनच या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे साकार होतात. तेग्या, काळू, मल्ला, तुका, नागि ही पात्रे परंपरावादी विचाराशी जखडून आहेत. पण ईश्वराच्या आधुनिक विचारसरणीमुळे परंपरावादी बेरड आणि आधुनिक ईश्वरा यांच्यात संघर्ष निर्माण होतो. यातुनच या बेरडांचा पांढरपेशी लोकांशी संबंध येतो. याबाबी लक्षात घेऊन रणजित देसाई यांनी व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत.

ग्रामीण परिसरात एक लहानसा भाग असलेले बेरड जमातीचे परंपरागत जीवन. त्यांच्या जीवनात होऊ घातलेले बदल आणि या जमातीला असणारी भवितव्याविषयीची काळजी. या सर्वांतून "बारी" कादंबरीत सामाजिक जीवनाचे चित्रण आले आहे.

बेरडांचे जग हे पांढरपेशी शहरी संस्कृतीपासून दूर असल्यामुळे मागासलेले, अशिक्षित असे आहे. त्यामुळे त्यांच्या बोलीतील ग्रामीणपणा स्पष्ट दिसतो. तसेच ही ग्रामीण बोली बेळगाव जवळील सुलगट्टीच्या जंगलातील बेरडांच्या तोंडची आहे. हे ही दिसून येते. हेच "बारी" कादंबरीच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्ये होय.

रणजित देसाई यांनी "बारी" कादंबरीच्या निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर केला आहे व पात्राच्या संवादासाठी त्यांच्याच बोलीचा वापर केला आहे. तसेच वेगवेगळ्या स्तरातील पात्राप्रमाणे ही बोलीभाषा बदलताना दिसते. त्यामुळे ती - ती पात्रे चटकन लक्षात येतात. अशा त-हेने भाषेचा वापर समर्पक केल्यामुळे "बारी" कादंबरी वाङ्मयदृष्टयाही चांगली वाटते.

........

## प्रकरण दुसरे

## संदर्भ

१) "बेरड आणि बारी", भीमराव गस्ती, रविवार सकाळ, १३ ऑक्टोबर, १९९१.

२) "बारी" प्रस्तावना वि.स. खांडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, तिसरी आवृत्ती, ४ जानेवारी, १९८८.

३) तत्रैव, "बारी" प्रस्तावना.

४) रणजित देसाई, "बारी" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, तिसरी आवृत्ती, ४ जानेवारी, १९८८, पृ. १७.

५) तत्रैव, पृष्ठ ४५.

६) तत्रैव, पृ. १५७.

७) तत्रैव, पृ. १९८.

८) तत्रैव, "बारी" प्रस्तावना.

९) तत्रैव, पृ. ३.

१०) तत्रैव, पृ. ७.

११) तत्रैव, पृ. ८४.

१२) तत्रैव, पृ. १४१.

१३) तत्रैव, पृ. १४८, १४९.

१४) तत्रैव, पृ. १६२.

१५) तत्रैव, पृ. १०.

१६) तत्रैव, पृ. ६१.

१७) तत्रैव, पृ. ६३.

१८) तत्रैव, पृ. ६४.

१९) तत्रैव, पृ. १४.

२०) तत्रैव, पृ. ७१.

२१) तत्रैव, पृ. ७१.

२२) तत्रैव, पृ. १५६.

२३) तत्रैव, पृ. १९२.

२४) तत्रैव, पृ. ४.

२५) तत्रैव, पृ. ४८.

२६) तत्रैव, पृ. ७०.

२७) तत्रैव, पृ. ४७.

२८) आनंद यादव, "मराठी साहित्य समाज आणि संस्कृती" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती, १९८५, पृ. १७१.

२९) ल.ग. जोग, "कादंबरी", पृ. १११.

३०) गो.मा. पवार, "साहित्यातील प्रादेशिकता:भाषा आणि निवेदन" निबंध.

.....